**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत**
एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत,तळमजला,लेबर कॅम्प,
धारावी रोड, माटुंगा (पुर्व) मुंबई -४०० ०१९
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५००
ई-मेल -agmhrrc@mahagenco.in वेबसाईट :- www.mahagenco.in

---

क्र.महानिर्मिती/जा.क्र.०४/२०२४/९५०१ दिनांक:२४.१०.२०२५

**सूचना**

**जाहिरात क्र.०४/२०२४ अंतर्गत 'तंत्रज्ञ-३' या पदाकरीता १:२ या प्रमाणात कागदपत्रे जमा करण्याकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.**

**संदर्भ**:- १) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४
२) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.१२११० दि.२८.११.२०२४
३) महानिर्मिती सूचना क्र.५३ दि.०३.०१.२०२५
४) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.१९१ दि.०७.०१.२०२५
५) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.८९२ दि.२९.०१.२०२५
६) महानिर्मिती सूचना क्र.३४७१ दि.२२.०४.२०२५
७) महानिर्मिती सूचना क्र.७४२९ दि.१८.०८.२०२५
८) महानिर्मिती सूचना क्र.८७७४ दि.२९.०९.२०२५

---

महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र. ०४/२०२४ अंतर्गत तंत्रज्ञ-३ या पदाकरीता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि.०८,०९,१० व १५.०५.२०२५ रोजी ऑनलाईन परीक्षा पार पाडण्यात आली होती.

महानिर्मिती कंपनीतील पात्र प्रकल्पग्रस्त प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी, कंत्राटी तत्वावरील बाहयस्त्रोत तांत्रिक उमेदवार आणि कोराडी-CSR कोटयातून अर्ज सादर केलेल्या आणि त्यानुसार अतिरिक्त गुण मिळण्यास पात्र उमेदवारांना द्यावयाच्या अतिरिक्त गुणांची यादी संदर्भिय क्र.०७ वरील सूचना क्र.७४२८ दि.१८.०८.२०२५ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील सूचनेनुसार अतिरिक्त गुणांबाबत संबंधित विद्युत केंद्र / कार्यालया मार्फत प्राप्त आक्षेप / तफावत उमेदवारांना देय गुणांमध्ये बदल करण्याचे प्राप्त पत्र विचारात घेऊन जाहिरातीत प्रसिध्द पदांसमोर १:२ या प्रमाणात कागदपत्रे जमा करण्याकरीता, ती पडताळणी करण्याबाबतची यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

उमेदवारांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त यादी ही ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेले गुण तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या रिक्त पदांची उपलब्ध संख्या व सामाजिक / समांतर आरक्षण विचारात घेवून १:२ या प्रमाणात तयार करण्यात आलेली आहे. **ऑनलाईन परीक्षेकरीता उपस्थित सर्व उमेदवारांचे ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुण अंतिम निवड यादीसोबत प्रसिध्द करण्यात येतील.**

तंत्रज्ञ-३ या पदाच्या कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी, कागदपत्रे जमा करणेकरीता खालील अटी व शर्तीची पुर्तता करणे ही सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी असेल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती** :-

१) उपरोक्त यादी ही, कोणतीही निवड अथवा प्रतिक्षा यादी नाही, याची उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

२) उमेदवाराने चुकीच्या कोटयातर्गत अर्ज सादर केला असल्यास म्हणजेच सामान्य श्रेणीत मोडणाऱ्या (प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी वगळून) ज्या उमेदवारांनी नजरचुकीने / जाणीवपुर्वक पात्र प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या राखीव श्रेणीतून अर्ज सादर केला असल्यास, अशा उमेदवारांचा विचार सामान्य (प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी वगळून) श्रेणीतूनच करण्यात आला आहे. तसेच प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी उमेदवारांनी नजरचुकीने सामान्य श्रेणी समोर अर्ज सादर केला असल्यास, अशा उमेदवारांचा विचार पात्र प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या राखीव श्रेणीतच करण्यात आला आहे.

३) वरील यादीतील सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, अनाथ व्यक्ती, माजी सैनिक व प्रकल्पग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र इत्यादी बाबतचे मूळ प्रमाणपत्रे ही कागदपत्रे जमा करतेवळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवाराचा पुढील भरती प्रक्रियेत विचार केला जाणार नाही.

४) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरीता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे पडताळणी / छाननी न करता बोलविण्यात आले होते. त्यानुसार आता, उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव,वय,जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, खेळामधील प्राविण्य, शारीरिक बाधित व्यंगत्वाचे प्रमाण, अनाथ व्यक्ती, माजी सैनिक व प्रकल्पग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र इत्यादी बाबतच्या मुळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल.

**५) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेची पात्रता यादी ही जाहिरातीत नमूद रिक्त पदांच्या १:२ या प्रमाणात प्रसिध्द करण्यात आली आहे. सबब, कागदपत्रे पडताळणीअंती अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या यादीत कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या सर्वच उमेदवारांचा समावेश नसेल, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.**

६) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेची पात्रता यादी १:२ या प्रमाणात तयार करण्यात आली आहे. सबब, सध्याच्या कागदपत्रे पडताळणीच्या यादीत दर्शविण्यात आलेला प्रवर्ग / समांतर आरक्षणात पडताळणीअंती अंतिम निवड / प्रतिक्षा यादीत बदल होऊ शकतो, याची देखील उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

७) कागदपत्रे जमा करण्याच्या पात्रता यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. ही यादी पूर्णत: जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

८) मागास प्रवर्गातील तसेच समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेदरम्यान सादर करणे बंधनकारक राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) ज्या उमेदवारांनी इ.मा.व.,सा.व शै.मा.वर्ग, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड व वि.मा.प्र या सामाजिक प्रवर्गातून तसेच "आदुघ" प्रवर्गातून अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांनी त्यांना लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वैध प्रमाणपत्र तसेच "आदुघ" प्रवर्गाकरीता लागू असलेले मिळकतपत्र (Income Certificate) संबंधीत सक्षम अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन दि.१०.०२.२०२५ पर्यंत वैध असलेले अथवा कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे.

१०) मागास प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या ज्या महिला उमेदवारांची कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेकरीता निवड ही खुला प्रवर्ग महिला आरक्षणातंर्गत (WR) / संबंधित मागास प्रवर्गातून झाली आहे (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती हे प्रवर्ग वगळून) अशा उमेदवारांनी संबंधित प्रवर्गातून महिला आरक्षणाकरीता लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जाहिरातीच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.१०.०२.२०२५) अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे.

११) संबंधीत पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींची किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवाराचा विचार पुढील भरती प्रक्रियेसाठी करण्यात येणार नाही / उमेदवाराची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१२) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून) ही जाहिरातीस अनुसरुन संबंधीत रिक्त पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी (दि.१०.०२.२०२५) प्राप्त केलेली असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे ही कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. तसेच उमेदवाराने, जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभव हे जाहिरातीस अनुसरुन संबंधीत पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण करीत असणे आवश्यक आहे.

१३) खेळाडू आरक्षणाअंतर्गत (SP) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्रे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१.०७.२०१६, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.राक्रीधो.२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक १८.०८.२०१६,महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/ क्रीयुसे-२ दिनांक ३०.०६.२०२२ व तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये संबंधीत पदांच्या निवडीकरीता वैध असल्याबाबत संबंधीत सक्षम अधिकारी यांचा वैधता अहवाल सादर करणे आवश्यक असेल अन्यथा पुढील भरती प्रक्रियेसाठी उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही.

१४) माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदरचे आरक्षण हे केवळ माजी सैनिकांनाच लागू असून त्यांच्या वारसांना या आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी. माजी सैनिकांकडे सेवेतून कार्यमुक्त करण्यात आल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्र (Discharge Certificate) जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले म्हणजेच दिनांक १०.०२.२०२५ रोजी पर्यंत वैध असलेले अथवा कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे. तसेच माजी सैनिक उमेदवारांनी यापूर्वी सदरील आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास, त्यांना पुन:श्च सदरील आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नसेल, याची विशेष नोंद घ्यावी.

१५) कागदपत्रे जमा करण्याची पात्रता यादी तयार करताना ऑनलाईन परीक्षेत समान गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांना बोलविण्यात आले आहे. तथापि, अशा उमेदवारांच्या अंतिम निवड यादीत समावेश करताना शासन नियमानुसार जन्मतारखेनुसार जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१६) दिव्यांग प्रवर्गासाठी जाहिरातीत नमूद दिव्यांग प्रकारात मोडत असणाऱ्या उमेदवाराजवळ शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.अप्रक्रि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६ दि.१४.०९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवितम नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र (UDID Card) असणे अनिवार्य आहे. अशा पात्र उमेदवारांमधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/प्र.क्र.३३१/सुधार-३, दि.०७.०६.२००६ अनुसार निवडीस / नियुक्तीस पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

दिव्यांग उमेदवारांजवळ कायमस्वरुपी दिव्यांग असल्याचे जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले म्हणजेच दिनांक १०.०२.२०२५ रोजी पर्यंत वैध असलेले अथवा सध्याच्या कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व वैध असणे आवश्यक आहे. तसेच सदरील प्रकरणी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१८/ प्र.क्र.११४/१६-अ दि.२९.०५.२०१९ व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१९/ प्र.क्र.२५१ दि.०२.०२.२०२१ मधील अटी व शर्ती लागू असतील.

१७) कागदपत्रे जमा करण्याची पात्रता यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे.

१८) कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी वाम मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास उमेदवाराची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१९) कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी जे उमेदवार विहीत केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणार नाहीत किंवा विहित दिनांकास गैरहजर असल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारचे निवेदन अथवा विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२०) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२१) कागदपत्रे जमा करण्याकरिता उपस्थित राहताना उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेल्या अर्जाची मुळ प्रत, त्यांची मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेला एक छायांकित संच (One Zerox copy set) स्वत:जवळ बाळगावा. तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊनच उमेदवाराने कागदपत्रे जमा करण्याकरीता नमूद ठिकाणी, दिवशी व वेळेवर उपस्थित राहावे. विहीत नमूद दिनांक व वेळेवर कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

२२) कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेची पात्रता यादी ही जाहिरातीत नमूद रिक्त पदांच्या १:२ या प्रमाणात प्रसिध्द करण्यात आली आहे. उमेदवारांनी कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेवेळी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची रितसर पडताळणी केल्यानंतर पात्र उमेदवारांची अंतिम निवड / प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

२३) तसेच वर नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेनंतर १:२ या प्रमाणात पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अतिरिक्त उमेदवार बोलविण्याचे / सदरील पद पुर्न: जाहिरात करण्याचे संपूर्ण अधिकार महानिर्मिती कंपनी राखून ठेवत आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२४) महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.५०२ दि.१७.०८.२०२२ नुसार सरळसेवा प्रवेशाव्दारे प्रसिध्द करण्यात येणाऱ्या पदांकरीता मागास प्रवर्गातून (Backward Class) अंतिम निवडी करीता एकूण गुणांपैकी किमान २०% गुण व खुल्या प्रवर्गातून (Open Category) अंतिम निवडीकरीता एकूण गुणांपैकी किमान ३०% गुण मिळविणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच महानिर्मितीतील प्रकल्पग्रस्तांकरीता राखीव कोटयातील पदांकरीता उमेदवारांना (मागास / अमागास) एकूण गुणांपैकी २०% गुण मिळणे आवश्यक आहे.

२५) प्रगत कुशल आरक्षणातर्गंत अभियांत्रिकी पदवी / पदवीधारक उमेदवारांचे सर्वसमावेशक प्रशिक्षणाची ०५ वर्षे किंवा अधिक पूर्ण झाली असल्यास, अशा उमेदवारांचा विचार ०५ वर्षे प्रगत कुशल प्रशिक्षण आरक्षणासमोर करण्यात आला आहे.

२६) दिव्यांग व अनाथ आरक्षणातून अपेक्षीत उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे गुणानुक्रमे इतर उमेदवारांकडून भरण्यात येईल. तथापि, सदरील पदांचा अनुशेष पुढील भरती प्रक्रियेतून भरण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२७) तसेच मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्रमांक ७९७४/२०२३ नुसार प्रगत कुशल ०५ वर्षे प्रशिक्षण कोटा व प्रगत कुशल १ ते ४ वर्षे प्रशिक्षण कोटा आरक्षणातून खुल्या प्रवर्गाचे प्रत्येकी ०१ पद निवड यादीत राखीव ठेवण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२८) तसेच सदरील निकाल मा.उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ औरंगाबाद आणि नागपूर येथे दाखल रिट याचिकां क्र.१३७९७/२०२४,१८६२१/२०२५,३७३०/२०२४,९८/२०२५,३९६२/२०२५,३८३७/२०२५ व १३७९/२०२५ व विविध मा.न्यायालयात दाखल इतर याचिकांच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

२९) तंत्रज्ञ-३ या पदाकरीता कागदपत्रे पडताळणीसाठी, ती जमा करण्याकरीता १:२ या प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची विद्युत केंद्र / कार्यालय निहाय यादी लवकरच महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. यास्तव उमेदवारांनी वेळोवेळी कंपनीच्या संकेतस्थळाला भेट देऊन अद्ययावत माहिती प्राप्त करून घ्यावी तसेच वर नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे पडताळणीवेळी आवश्यक असलेली कागदपत्रे तयार ठेवावीत.

१) **सामान्य संवर्गातील उमेदवारांची यादी**

२) **महानिर्मिती कंपनीचे किमान ०५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या पात्र प्रकल्पग्रस्त उमेदवारांची यादी**

३) **महानिर्मिती कंपनीचे ०१ वर्ष ते ०४ वर्षे कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या पात्र प्रकल्पग्रस्त उमेदवारांची यादी**

४) **बी.टी.आर.आय.आरक्षणातंर्गत उमेदवारांची यादी**

**टीप:** वरील प्रसिद्ध यादीबाबत काही आक्षेप असल्यास संबंधित उमेदवार सूचना प्रसिद्ध केल्यापासून ०७ दिवसांच्या आत hohrpap@mahagenco.in या ई- मेल वर आक्षेप/ निवेदन नोंदवू शकतात. तसेच उमेदवार ०२२- ६९४२५०० ( विस्तारीत क्रमांक ५११७ ) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

**(डॉ.नितीन वाघ)**
**कार्यकारी संचालक (मासं)**
**महानिर्मिती**